# BK BIRLA CENTRE FOR EDUCATION

**SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS**
**SENIOR SECONDARY CO-ED DAY CUM BOYS' RESIDENTIAL SCHOOL**

B K BIRLA CENTRE FOR EDUCATION (Sarala Birla Group of Schools)

INDIAN PUBLIC SCHOOLS' CONFERENCE

**MID-TERM EXAMINATION 2024-25**

**MARATHI**

Class : X | Duration : **3** Hrs
Date : 25.09.2024 | Max. Marks : **80**
Admission No.: | Roll No.:

---

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :**

(1) सूचनेप्रमाणे आकलनकृती व भाषाभ्यास यांमधील आकृत्या काढाव्यात.
(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.
(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.
(4) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

**विभाग – अ गुण (40)**

**प्र 1 :– (आकलन ) अ: अपठित गद्यांश** **(1X5=5)**

वृक्ष आपले गुरू आहेत. निस्वार्थपणा, परोपकार, त्याग हे गुण वृक्षांपासून शिकावेत . ते आपल्या आरोग्याचीही दखल घेतात. ते आपल्या उदरभरणाची काळजी वाहतात. सर्दीपडशापासून कॅन्सरसारख्या रोगांवर वनस्पतीपासून औषधे मिळतात. वृक्षांची मुळे जमिनीत ओलावा धरून ठेवतात तसेच वृक्षांमुळे जमिनीची धूप थांबते.,पाऊस पडतो,थंडावा मिळतो. या वृक्षवल्लींनी आपली किती काळजी घ्यावी,हयाला काही सीमाच नाही. नवनवीन प्रकारच्या वस्त्रनिर्मितीकरता लागणारा धागा निर्माण करण्याच्या प्रक्रियेसाठी वृक्षवल्लींचीच आवश्यकता असते म्हणजे आपल्याला रंगीबेरंगी वस्त्रांनी नटवण्यात हयांचाच वाटा. केसात माळायला फुले देखील हयांचीच देणगी एवढेच कशाला पाण्यात बुडणा–या माणसाला मिळणारा फळीचा आधार तो ही हयाचाच तात्पर्य काय माणूस हा वृक्षांच्या आधाराशिवाय जगूच शकत नाही. आपल्या उपकारकर्तावर असा घाला घालणे योग्य नाही हा घाला घालण्यासाठी लागणारी कु–हाड सुध्दा लाकडाचीच ! म्हणजे वृक्ष हवाच.

**कृती 1 आकलन :– आकृतीबंध पूर्ण करा –**

1 कोणते गुण वृक्षापासून शिकावेत :–

1 ——————   2 ————————   3 —————————

2 वृक्षांमुळे कोणते फायदे होतात :–

1—————————   2 ————————   3 —————————

3 वस्त्रनिर्मीतीत कोणाची आवश्यकता असते ?

4 वृक्षांच्या आधाराशिवाय कोण जगू शकत नाही ?

5 कोण आपले गुरू आहेत ?

**प्र 1:– (आकलन ) आ: अपठित गद्यांश** **(1X5=5)**

केवळ धडाडी दाखवून सर्व कामे होतात असे नाही प्रश्नाच्या मुळाशी जाऊन कल्पकतेने मार्ग काढले तर अनेक प्रश्न मुळातून सुटतात, याचं भान किरण बेदींना आहे. 1980 मध्ये पश्चिम दिल्लीच्या जिल्हा पोलीस आयुक्तपदाची सूत्रं त्यांच्याकडे आली हा भाग त्याकाळी गुडांचा, दरोडेखोरांचा प्रदेश म्हणून ओळखला जायचा. इथल्या गुडांना त्यांनी वठणीवर आणलं . या विभागातील काही जण दारू गाळण्याचा धंदा करायचे , ज्यावेळी किरण बेदी या प्रश्नाच्या

मुळाशी गेल्या तेव्हा त्यांना जाणवलं की हे सर्व लोक बेरोजगार आहेत म्हणून हा धंदा करताहेत त्यावेळी त्यांनी या लोकांना बॅकांचं कर्ज मिळवून दिलं जागा मिळवून दिली. त्यामुळे या माणसांनी आपला व्यवसाय बदलून टाकला त्याकाळी हा एक चमत्कारच मानला गेला.किरण बेदींचे नाव भारतभर पसरायला त्यांची एक कामगिरी खूप महत्त्वाची ठरली ती म्हणजे तिहार जेलचा त्यांनी केलेला कायापालट तिहार तुरूंगाची क्षमता आहे दोन हजार कैदयाची परंतु प्रत्यक्षात तेथे आठ ते दहा हजार कैदयांना ठेवले जाते एखदया कैदयाला तुरूंगात ठेवण्याचा हेतू हा असतो की तिथून बाहेर पडून तो समाजात पुन्हा नीट मिसळू शकेल पण हा हेतू सफल होणं जवळपास अशक्यच होतं मात्र हे काम किरण बेदींनी करुन दाखवलं

पंश्न :–

1 1980 साली किरण बेदी कोणज्या पदावर होत्या ?

अ प्राचार्य　　　　ब संचालक

क पोलीस आयुक्त　　　　ड अध्यक्ष

2 काही जण दारू गाळण्याचा धंदा का करत होते ?

अ अशिक्षित असल्यामुळे　　　　ब वाईट असल्यामुळे

क शिक्षित असल्यामुळे　　　　ड बेरोजगार असल्यामुळे

3किरण बेदींनी कोणत्या जेलचा कायापालट केला ?

अ येरवडा　　　　ब तिहार

क अंदमान　　　　घ मुंबईजेल

4 त्याकाळी गुडांचा, दरोडेखोरांचा प्रदेश म्हणून कोणता भाग ओळखला जायचा ?

अ पश्चिम दिल्लीचा　　　　ब पूर्व दिल्लीचा

क उत्तर दिल्लीचा　　　　ड दक्षिण दिल्लीचा

5 बेरोजगारांना बेंदींनी कोणाकडून कर्ज मिळवून दिले ?

अ सावकार　　　　ब बॅकेकडून

क पाटलांकडून　　　　ड ग्रमपंचायतीकडून

**प्र 3 सूचेनेनुसार योग्य पर्याय निवडा.　　( कोणतेही चार)　　(4X1=4)**

1 **संगीताने** मला मदत केली.　( अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

अ सर्वनाम　　ब विशेषण　　क नाम　　ड अलंकार

2 बापरे! किती पाऊस पडतोय हा! ( केवलप्रयोगी अव्यय ओळखा)

अ किती　　ब बाप रे　　क पाऊस　　ड पडतोय

3 विठोबाचे हात **कमरेवर** आहेत.　(अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

अ क्रियाविशेषण अव्यय　　　　ब विशेषण

क शब्दयोगी अव्यय　　　　ड सर्वनाम

4 अभिलाषाने काल रात्री खूप अभ्यास केला ( क्रियाविशेषण अव्यय ओळखा)

अ काल　　ब खूप　　क अभ्यास　　ड रात्री

5 रिना आली **आणि** तिने भाषण दिले ( आधोरेखित शब्दाची जात ओळखा)

अ विशेषण　　　　ब उभयान्वी अव्यय

क क्रियाविशेषण अव्यय　　　　ड अलंकार

**प्र 4 काळ ओळखा व बदला　　( कोणतेही तीन)　　(3X1=3)**

1 दर्शनने आज सुट्टी घेतली आहे.　　( काळ ओळखा).

1. सई दिलेले काम पूर्ण करेन.　　( काळ ओळखा)

2. काल काका शाळेत आले होते.　　( भविष्यकाळ करा )

3. संत समाज सुधाारक आहेत. ( भूतकाळ करा)

**प्र 5 वाक्याचे प्रकार ओळखा ( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1 किती छान आहात तुम्ही सर्वजण !

2 कासारा घाटाचा रस्ता खूप अवघड आहे. ( नकारार्थी करा )

3 बाबा मी सहलीला जाऊ का ?

4 वेदांत दररोज अभ्यास कर.

**प्र 6 समानार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 चरण

2 धवल

3 असुर

**प्र 7 विरुध्दार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 अशिक्षित

2 गढूळ

3 अपेक्षित

**प्र 8 लिंग बदला ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 सम्राज्ञी

2 सांडणी

3 कवयित्री

**प्र 9 वचन बदला ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**1** घागर

2 गंमत

3 माळ

**प्र 10 समास ओळखा ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**1** मातापिता

2 चौकन

3 प्रतिदिन

**प्र 11 पाठ्पुस्तक गदय** **(1X5=5)**

**खालील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा :–**

अब्दुल बसस्टापवर आला. अनेक ठिकाणी उसवलेल्या स्वेटरमधून थंडी चांगलीच जाणवत होती. बस आली बांगडयाची पेटी आणि पिशवी सांभाळत अब्दुल बसमध्ये चढला. अगदी खिडकीजवळ बसला. पेटी अलगद उचलून त्याने आपल्या मांडीवर ठेवली गर्दीत कुणाचा धक्का लागला तर....? लाल, हिरव्या, निळया रंगीबेरंगी बांगडयांकडे मोठया कौतुकाने त्याने बघितले बस सुरू होताच थंडगार वा–याचा झोत अधिकच त्रासदायक वाटू लागला. अब्दुलने मफलर कानाला घट्ट लपेटून घेतला .जिल्हाधिकारी कचेरीजवळ पाऊण बस रिकामी झाली तपोवनाकडे कोण जातोय कशाला ?

**प्रश्न :– कोणतेही पाच**

1 वरील उतारा कोणत्या पाठातील आहे ?

2 कोणत्या गोष्टी सांभाळत अब्दुल बसमध्ये चढला ?

3 पेटीत कोणकोणत्या रंगाच्या बांगडया होत्या ?

4 कोणत्या ठिकाणी पाऊण बस रिकामी झाली ?

5 अब्दुलने मफलर कानाला का गुंडाळली ?

6 अब्दुल कोणत्या ठिकाणी बांगडया भरायला जात असे ?

**प्र 12 खालील कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा :–** **(1X5=5)**

अग्निमाजिपडे बाळू। माता धावे कनवाळू।।1।।
तैसा धांवे माझिया काजा । अंकिला मी दास तुझा ।।2।।
सवेंचि झेपावें पक्षिणी । पिलीं पडजांचि धरणीं ।।3।।
भुकेलें वत्सरावें । धेनु हुंबरत धांवे ।।4।।
वणवा लागलासे वनीं। पाडस चिंतीत हरणी ।।5।।

**कृती 1: ( आकलन )**

(1) कवितेतील माता आणि हरिणीचे वर्णन करणारे शब्द –:
कवितेत आलेल्या दोन प्राण्यांची नावे लिहा :–

**कृती (2) कोण ते लिहा :–**

(अ) परमेश्वराचे दास –

**कृती 3 खालील कृती केव्हा घडतात ते लिहा :–**

(1) धरणीवर पक्षिणी झेपावते
(2) गाय हंबरत धावते

**विभाग –ब –40 गुण**

**प्र 1 साहित्य गद्य**

**प्र 1 अ) एका वाक्यात उत्तरे लिहा:– ( कोणतेही तीन )** **(3X1=3)**

1 तपोवनातील स्त्रिया व मुलींना अब्दुल कोणासारखा वाटे ?
2 प्रमोशन मिळालेले पंतांचे सहकारी कोण होते ?
3 सभा संमेलने गाजवणारे कवी कोण होते ?
4 कृष्णा नदीचा प्रवाह कसा होता ?
5 डॉ. माशेलकर यांची प्राथमिक शाळा कोठे होती ?

**प्र 1 ब ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :–( कोणतेही तीन )** **(3X1=3)**

1 दक्षिण गोव्यातील माशेल येथे लेखकांचे ––––––– गेले.
2 तपोवनातील गोलाकार –––––– अब्दुलचे लक्ष गेले.
3 माझ्या खाजगी –––––– हकीकत चाळीत जाहीर झाली.
4 मी शनिवार पेठेतील –––––– मंदिराच्या पुलावर बहुधा जात असे..
5 मी सुटकेसमधील ––––––– शाल काढली.

**प्र 1 क) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा:– ( कोणतेही एक )** **(1X3=3)**

1 चुडीवाला पाठाअंतर्गत अब्दुलचे व्यक्तिचित्र रेखाटा ?
2 डॉ.रघुनाथ माशेलकर यांच्या यशामध्ये त्यांच्या आईचा मोठा वाटा आहे हे विधान स्पष्ट करा ?
3 उपास पाठातील तुम्हांला सर्वांत आवडलेला विनोद कोणता ? तो का आवडला ते स्पष्ट करा.

**प्र 2 पद्य ( कविता वरील प्रश्न )**

**प्र 2 (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा :– ( कोणतेही तीन )** **(3X1=3)**

1 संत नामदेवांनी देवाशी स्वतःचे कोणते नाते सांगितले आहे ?
2 कवी नारायण सुर्वे यांनी शाळा कशास म्हटले आहे ?
3 कवी नारायण सुर्वे यांना आपली जिंदगी कशामध्ये बरबाद झाली असे वाटते ?
4 मेघाला विनवणी कोण करत आहे ?
5 सकलसंतगाथाचे संपादक कोण आहेत ?

**प्र 2 ब ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :–( कोणतेही तीन )** **(3X1=3)**

1 झोतभट्टीत शेकावे------ तसे आयुष्य छान शेकले गेले.
2 नामा म्हणे ------ जैसा विनवितो
3 दुनियेचा विचार ------ केला, अगा जगमय झाली.
4 हे हात माझे सर्वस्व --------- गहाणच राहिले .
5 --------- करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे.

**प्र 2 क) पुढील कवितेच्या दिलेल्या मुद्दयांच्या आधारे कृती करा (1X3=3)**

कविता – दोन दिवस

(1) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री

(2)प्रस्तुत कवितेचा विषय

(3) प्रस्तुत कवितेतील पुढील दोन ओळींचा अर्थ –

हरघडी अश्रू वाळविले नाहीत, पण असेही क्षण आले
तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहायास आले।।

**प्र 3 स्थूलवाचन :– एका वाक्यात उत्तरे लिहा :– ( कोणतेही दोन ) (2X1=2)**

1 बार्क म्हणजे काय ?
2 बार्क मध्ये जवळपास किती मुल–मुली होते ?
3 लेखक ट्रेनिंग स्कूलला असतांना होमी भाभा किती वेळा तेथे आले होते ?

## लेखन

**प्र 4 खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा :– (1X8=8)**

**1** जंगलाचे आत्मकथन

मुद्दे:– सजीव सृष्टी –– उपयोग –– महत्त्व ––– मानवामुळे झालेली अवस्था ––– उपाय –– अपेक्षा.

**2 आजचा विदयार्थी**

**मु**द्दे :– देशाचे भविष्य ––– सध्याची स्थिती ––– तणाव व समस्या ––– अपेक्षा

**3 वाढते प्रदूषण –मोठी समस्या**

मुद्दे :– प्रदूषणाचे प्रकार ––– कारणे ––– परिणाम ––– उपाय

**प्र 5 मुद्दयावर आधारित गोष्ट लिहा. (शीर्षक आणि तात्पर्य आवश्यक) (1X7=7)**

वृध्द श्रीमंत शेतकरी ––– मुले आळशी –– सर्व संपत्ती शेतात पुरली आहे, असे सांगतो ––– मुले शेत नांगरून शोधतात ––– संपत्ती मिळत नाही –– नागरलेल्या शेतात पेरणी ––– पीक बहरते––– तात्पर्य .

किंवा

पाण्याबाहेर कासव येते–– काठावर बेडूक आनंदाने उडया मारत मजा करतो –– आपल्या जड शरीराकडे पाहून कासव दुःखी ––– अचानक आकाशातून घार येऊन बेडकाला उचलून नेते –––कासव स्वतः बद्दल दुःख करणे सोडून देतो. –––तात्पर्य.

**प्र 6 पत्र लेखन :– ( कोणतेही एक ) (1X5=5)**

(1) तुमच्या शाळेजवळील बसच्या फे–यांची वारंवारिता वाढविण्याची मागणी करणारे पत्र बस डेपोच्या आधिका–यास लिहा

**किंवा**

तुम्ही राहत असलेल्या भागात दूषित पाणीपुरवठा होत असल्याची तक्रार करणारे पत्र नगरपालिकच्या पाणीपुरवठा विभागास लिहा :–

:::::::::::::::::::::: **समाप्त** ::::::::::::::::::::::::::